जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUN 2021
तरूण भारत

# सेट परीक्षेसाठी अभ्यासाचे योग्य नियोजन करा

## डॉ. कृष्णा पाटील यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महाविद्यालयामध्ये सहाय्यक प्राध्यापक होण्यासाठी सेट–नेट परीक्षा उत्तीर्ण अनिवार्य आहे. त्यामुळे सेट–नेट परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे योग्य नियोजन करावे, नियमित अभ्यासक्रमाच्या पुस्तकांचा सातत्याने अभ्यास केल्यास हमखास यश मिळेल, असे मत डॉ. कृष्णा पाटील यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सेट परीक्षा मार्गदर्शन व्याख्यानमालेत ते बोलत होते.

डॉ. पाटील म्हणाले, परीक्षांचे बदललेले स्वरूप लक्षात घेवून नियोजनपूर्वक अभ्यास करणे गरजेचे आहे. पदवी प्रथम वर्षापासून सेट–नेट परीक्षेचा अभ्यास करण्याची गरज आहे. या व्याख्यानमालेत राज्यातील दोन हजार विद्यार्थ्यांची ऑनलाईन उपस्थिती होती. डॉ. ए. एम. गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती. महेश चव्हाण यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

04 JUN 2021
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या 'माझं गाव कोरोनामुक्त गाव' अभियानामुळे नवी चळवळ उभी राहील : डॉ. साळुंके

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने राबविण्यात येत असलेले 'माझं गाव कोरोनामुक्त गाव' अभियानामुळे सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात गाव कोरोनामुक्त करण्याची नवी चळवळ उभी राहील. याच्या माध्यमातून एक नवी चेतना गावस्तरावर निर्माण होईल, असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे माजी राज्य संपर्क अधिकारी डॉ. अतुल साळुंके यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या वतीने 'माझं गाव कोरोनामुक्त गाव' अभियान ऑनलाईन उद्घाटन समारंभप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

राज्य संपर्क अधिकारी प्रा. डॉ. प्रभाकर देसाई, क्षेत्रीय कार्यालय महाराष्ट्र व गोवा विभागाचे युवा अधिकारी अजय शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत परिस्थिती गंभीर आहे. गाव कोरोनामुक्त असायला हवे तरच देश कोरोनामुक्त होऊ शकेल. म्हणून मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, माजी कार्यक्रम समन्वयक संजय ठिगळे आदी उपस्थित होते. प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे संचालक अभय जायभाये यांनी केले. कोल्हापूर जिल्हा समन्वयक डॉ. डी. जी. चिघळीकर यांनी सूत्रसंचलन केले. सांगली जिल्हा समन्वयक प्रा. सदाशिव मोरे यांनी आभार मानले.